स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- २१ मे, २०२४

---

जळगाव दि. २१ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेतर्फे मंगळवार दि. २१ मे रोजी बुध्द पौर्णिमेनिमित्त 'शील संवर्धनातून प्रज्ञेचा विकास' या विषयावर धम्मचर्चा आणि तथागत बुध्दांच्या विचारांवर आधारित गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे व व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, विचारधारा प्रशाळेचे प्र.संचालक प्रा. म. सु. पगारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी बुध्द पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. अधिसभा सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी जागतिक पातळीवर असलेल्या बुध्दांच्या शांततेचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. तसेच अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांनी बुध्द तत्वज्ञानातील मानसिक, कायिक, वाचिक क्रिया या शीलसंवर्धनासाठी उपयुक्त असल्याचे महत्त्व विस्तृत केले. विचारधारा प्रशाळेचे प्र.संचालक प्रा. म. सु. पगारे यांनी पंचशिलाचे महत्त्व पटवून देवून सांगितले की, आपले आचरणात शीलसंवर्धनातून सुधारणा करावी. यासाठी बुध्दांनी सांगितलेल्या श्रृत प्रज्ञा, चिंतन प्रज्ञा, भावनामय प्रज्ञा यांचा अवलंब करून आपण शीलसंवर्धन करू शकतो. यातूनच आपली एकग्रता वाढते व मानव जीवन जगण्यासाठी शील हे महत्त्वाचे असते.

यानंतर बुध्दांवर आधारित गीतगायनाचा कार्यक्रम झाला यात विद्यार्थिनी सुकन्या जाधव हिने भिमराया मुळे आम्हा बुध्द मिळाले हे गीत सादर केले. प्रा. विजय घोरपडे यांनी महाकारूणीक तथागताला त्रिवार ही वंदना, प्रा. म. सु. पगारे यांनी स्वयंरचित गाणे (नितिज्ञा) बोधीज्ञानाच्या रस्त्यावरती जीवन समजले मला, प्रा. बाळासाहेब सुर्यवंशी यांनी वंदन माणसाला, प्रा. सुबोध वाकोडे यांनी बा तथागता काव्यसंग्रहातील कविता, कैलास पाटील यांनी भिमराया मुळे आम्हा बुध्द मिळाले, प्रा. कृष्णा संदानशिव यांनी मी वादळवारा, प्रा. राकेश गेडाम यांनी दिले तू आम्हाला बोधीवृक्षाची छाया कसे ऋण फेडू तुझे भिमराया अशा गीतांचे यावेळी सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. विजय घोरपडे यांनी केले तर आभारप्रदर्शन समन्वयक गौरव हरताळे यांनी केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारीकरीता